₹ 25.00 ISBN 978-81-237-2644-1

नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया



# रेशमा

सरदारसिंग बैनाडे



*नवसाक्षर साहित्यमाला*

# रेशमा

**सरदारसिंग बैनाडे**

चित्रे

**संतोष गुप्ता**

एकः सूते सकलम्
NBT INDIA

नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया

ISBN 978-81-237-2644-1
प्रथम प्रकाशन : 1999 *(शके 1920)*
पहिली आवृत्ती : 2004 *(शके 1926)*
दुसरी आवृत्ती : 2012 *(शके 1934)*
तिसरी आवृत्ती : 2012 *(शके 1934)*
© नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, 1999
Reshama *(Marathi)*
₹ 25.00
संचालक, नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया
नेहरू भवन, 5 इन्स्टिट्युशनल एरिया, फेज-II
वसंत कुंज, नवी दिल्ली-110 070 यांनी प्रकाशित केले.

एक वेळ घड्याळ बंद पडेल. पण कोंबडा वेळेवरच बांग देणार. आजही कोंबड्याची वेळेवर बांग झाली. नामा उठला. चूळ भरली. गायीची धार काढू लागला. राधाने चूल पेटवली. चहा ठेवता ठेवता ती म्हणाली, "आवं...ऐकलं का? दूध टाकून येतांना रेशमाला आंबोण आणा."

दुधाची धार सर सर वाजत होती. "संपली का आंबोण?" असे म्हणत दुधाने भरलेली चरवी नामाने



ओट्यावर ठेवली. तेवढ्यात राधाने त्याच्या हातात चहाचा कप दिला. चहा घेत घेत नामा म्हणाला, "आगं! मी येवोस्तर पोरांना शाळेत पाठव. छाया, रेशमाला चारापाणी कर."

नामाने चरवीतले दूध कॅनमध्ये ओतले. झुंजूमुंजू झाले होते. पाखरांची किलबिल चालू होती. त्याने कॅन उचलली. शेजारच्या गावातील डेअरीच्या वाटेने तो चालू लागला. चालता चालता दुधाचा हिशोब करू लागला. येणाऱ्या पैशातून रेशमाला पायलीभर खाद्य घ्यायचे. बाकी किती पैसे रहातात, याची वजाबाकी करू लागला. तेवढ्यात डेअरी आली.

त्याचे लक्ष पाटीकडे गेले. तेथे लिहिले होते, 'दूध व्यवसायाची धरा कास! उत्पन्न वाढेल हमखास.' नामाला याची प्रचीती आली होती. त्याने दूध घातले. हाती पन्नासची कोरी करकरीत नोट पडली.

एकट्या छाया गायीच्या दुधाचे पन्नास रुपये. चारआठ दिवसात रेशमा विणार. मग तर काय या विचाराने नामा हरखला होता. तो निघाला. दुकानावर गेला.

त्याला पहाताच दुकानदार म्हणाला, "काय मालक! भलतेच खूष दिसता." नामाने हसत मान डोलावली. त्याने साखर, पत्ती घेतली. रेशमासाठी पायलीभर आंबोण घेतले. दोन किलो बाजरी, एक किलो गूळ घेतला.





एका हातात कॅन. दुसऱ्या हातात पिशवी घेऊन नामा चालू लागला. घराच्या वाटेवर झाडांतून कोवळे सूर्यकिरण डोकावत होते. त्याची पावले भरभर पडू लागली. समोरून एक दाढी वाढलेला माणूस येत होता. त्याच्या अंगावरचे कपडे मळकट होते. शर्टाची बाही थोडी फाटलेली होती. त्याच्या लुकड्या शरीरामुळे तो खूप हताश वाटत होता. तो दूर अंतरावर होता. पण ओळखीचा वाटत होता. सखा तर नाही? क्षणभर नामाची पावले थबकली.

सखा तर मुंबईला गेलेला होता. पण मग हा कोण? असा विचार करतो न करतो तोच 'राम राम नामा' हे शब्द कानावर पडले. ओळखीचा वाटणारा तो माणूस सखाच होता. नामाचा बाळपणीचा सोबती. पोट भरायला मुंबईला गेलेला.

"कसं काय सखा. काय म्हणते मुंबई. ठीक चाललेय ना. पोरं काय म्हणतात?" एका दमात नामाने तीनचार प्रश्न केले. काय उत्तर द्यावे या विचारात सखाने "ठीक आहे," असे खोल आवाजात म्हटले. तोवर त्याच्या डोळ्यातली आसवे गालावर ओघळली होती. सखाचा कंठ दाटला होता. नामाने कॅन खाली ठेवली. सखाला शांत करत त्याला खाली बसवले. त्याने विचारले, "केव्हा आलास तू?"

"रात्रीच आलो," सखा म्हणाला. "परत केव्हा जाणार?" नामाने प्रश्न केला.



"परत जायचा विचार नाही," तोंड लपवत सखा म्हणाला, "मुलंबाळं बायको पोरं घेऊन आलो." काय आणि किती सांगावे, कसे सांगावे असे त्याला झाले होते. अनेक वर्षांची अबोल दुःखे पोटात साठली होती. मनातले सांगावे असा एकच माणूस होता. तो म्हणजे नामा. दोघे जिवलग दोस्त. दोघांचीही परिस्थिती गरिबीची. हातातोंडाशी गाठ. सखाची आई तो दहाबारा वर्षाचा असतांनाच वारली. घरात बाप, एक भाऊ, दोन बहिणी. तशात बापाने लहानपणीच लग्न करून दिलेले. पुन्हा खाणारी तीन तोंडे वाढली. जेमतेम तीन एकर शेती. तिच्यात काही पिकेना. येणाऱ्या पिकात सखाचे धकेना.

तशी सखाने मुंबईची वाट धरली. सात आठ वर्षे तेथे काढली. पण जगण्यापलीकडे दुसरे काहीच केले नाही. कमाई झाली ती आणखी दोन पोरांची. अशी सारी कथा. त्यात मुंबई शहर म्हणजे अडचणींचे माहेरघर.

रहायला घर नाही. उघड्यावर झोपायचे. थंडी, ऊन, वाऱ्यापावसात अंग चोरुन रहायचे. जिवंत असूनही मेल्यासारखी गत. झोपडीत जागा नाही. गाडीत पाय ठेवायला जागा नाही.

अशातच कामावर जायचे. संध्याकाळी घरी येऊ की नाही याची खात्री नाही. कसेबसे दाटीवाटीने रहाणाऱ्या चिमण्या जीवांना कोणी दमदाटी तर करणार नाही. या

चिंतेत काम करायचे. रॉकेलचा गाडा आला तर स्टोव्हला हवा. नाहीतर हवा खाऊनच रहावे. पोरांचे कागद वाचण्याचे वय. त्यांना कागदं वेचायला पाठवायचे. भाकरीच्या तुकड्यासाठी पोरांची कसली शाळा आणि कसले शिक्षण. जिद्दीने गेलो पण पुरता नाउमेद झालो.

''बाबा म्हणत होता 'असे येड्यावानी करू नको. गांव सोडून जाऊ नको.' मी ऐकले नाही.''

मनातील मळमळ सखाच्या तोंडून बाहेर येत होती. डोळे पाझरत होते. उपाशी पोटातला तो वणवा होता. नामा त्याला थोपटत होता.

सखा थोडा शांत झाला. डोळे पुसता पुसता त्याची नजर कॅनकडे गेली. नामाची अगोदरची परिस्थिती त्याने बघितली होती. चन्द्रमौळी झोपडीत नामा रहायचा. कान तुटलेल्या कपात चहासाठी दूध आणायचा. आज मात्र त्याच्याजवळ दुधाची कॅन. त्या कॅनजवळच दुसरी एक पिशवी होती. ती बघून सखाने विवारले ''काय घेऊन चालला हे?''

नामा म्हणाला, ''अरे! माझी रेशमा गरोदर आहे.'' असे म्हणताच सखाने त्याच्याकडे प्रश्नार्थक नजरेने पाहून विचारले, ''केव्हा लग्न केले पोरीचे. कुठे दिली. मुलगा काय करतो. मला चिठ्ठी सुद्धा दिली नाही.''

''अरे बाबा पोरगी अजून सोळा वर्षाचीच आहे. अठरा वर्षाची झाल्याशिवाय लग्न करता येत नाही. आणि तिचे



शिक्षण चालू आहे. शिक्षण पुरे झाल्याशिवाय उजवायचे नाही तिला,'' नामा म्हणाला.

''मग ही रेशमा कोण?'' सखाने विचारले. ''हं! मला वाटलेच,'' असे म्हणून नामा म्हणाला, ''अरे! रेशमा माझ्या गायीचे नांव आहे.'' ''आणि मग पोरीचे नांव काय आहे?'' सखाने पुन्हा विचारले.

नामा उत्तरला, ''सीमा. पोरीसारखाच रेशमाला जीव लावतो मी. तिला मुलगीच समजतो माझी. खरं सांगू सखा! रेशमा माझी गाय नाही. ती माझी माय आहे. संसाराची साय आहे. तिनेच मला जगवले. कामाला लावले. मुलांना शाळेत पाठवले. तिचे आंबोण, पौष्टिक खाद्य घेऊन चाललो आहे.''

''एवढी काळजी घेतोस गायीची?'' सखाने आश्चर्याने विचारले.

''हो. हो घेतलीच पाहिजे,'' असे म्हणत सखा सांगू लागला. बाई गरोदर असली की आपण कशी तिची काळजी घेतो. फळफळावळे आणतो. पौष्टिक आहार देतो. मग गायीला नको? मुके जनावर असले म्हणून काय झाले. तिच्या पोटातल्या गर्भाची सुद्धा चांगली वाढ झाली पाहिजे. त्यामुळे कालवड झाली तर ती कालवड पुढे जास्त दूध देईल. बैल, गोऱ्हा झाला तर ताकदवान होईल. दमदार होईल. शेतीला चांगला उपयोगी पडेल म्हणून आंबोणीचा

सुग्रास घेऊन चाललो. आणि तिचे दिवस भरत आल्यामुळे थोडी बाजरी आणि गूळही घेतलाय. व्याल्यानंतर तिला खायला.''

मध्येच सखा म्हणाला, ''गूळ आणि बाजरी कशासाठी खाऊ घालायची?''

''त्यामुळे गाय जास्त दूध देते.'' नामा म्हणाला.

''अरे पण बोलायच्या नादात तुझे स्वागत करायचे राहिले.'' सखाने प्रश्न केला, ''कशासाठी तू गावी परत आलास?'' नामा म्हणाला, ''कसलं काय? गांवात पोट भरेना. मुंबईला गेलो. तेथे धकेना म्हणून परत गांवाला आलो. इकडे आड तिकडे विहीर. तूच सांग मी काय करू?''

सखाचे बोलणे पुरे होण्याच्या आत नामा म्हणाला, ''शेती कर. बळीराजा तू. वाडवडिलांनी म्हटले आहे. उत्तम शेती...''

सखा मध्येच म्हणाला, ''नामा! खरेच सांग शेती उत्तम राहिली आहे का? अरे! बळी राजातला 'राजा' बळी चाललाय.''

''नाही सखा. तसे नाही. केवळ शेती कर असे मी म्हणत नाही. शेती बरोबर एखादा जोडधंदा कर. जोडधंदा असेल तर चांगले भागते. माझा तसा अनुभव आहे. पण एक मात्र खरे. थोडी कळ सोसावी लागते. चंद्राला ढगातून तसे माणसाला संकटातून जावे लागते.''



''नामा माझी तयारी आहे. कष्टाचे मला वावडे नाही. पण मला वाटच सापडेना.''

''तू मनाचा निर्धार कर. माझी गत अशीच होती. पण मी आज समाधानी आहे. अरे सखा! बोलता बोलता बराच उशीर झाला. राधा घरी वाट पहात असेल. तू असे कर. माझ्याबरोबर चल. आपण लवकर जाऊ. तेथेच जेवू. तू माझ्या गायी बघ. हा धंदा कसा आहे ते तुला सांगतो. तुला पटला तर तू हाच धंदा कर. काळाची पावले ओळख. हातच्या कांकणाला आरसा कशाला? चल लवकर. तुला सगळे सांगतो.''

सखा आणि नामा चालू लागले. रेशमाने दुरुनच नामाला



ओळखले. ती जोराने हांबरली. धनी आल्याचे राधाने ताडले. न्याहारीचे ताट लावायला ती उठली. चुलीकडे गेली. सखा म्हणाला, ''ओळखलं का वहिनी! मित्रानेच लवकर ओळखले नाही. मग तुम्ही तरी कशा ओळखाल.''

''भाऊजी! तुम्ही मुंबईची मोठी माणसं. ओळखून बी ओळख देत नाही. आम्ही खेड्याची माणसं, कधीच असं करत नाही. बरं जाऊ द्या. हात धुवा लवकर. न्याहारी करून घ्या.''

राधा सखा बोलत होते. खुशाली विचारत होते. तोवर नामा गोठ्याकडे जाऊन आला. रेशमाची कास मोठी झाली होती. दुधाने तरारुन भरली होती. शेपटीलगतचा मणक्याचा भाग खोलगट दिसत होता. एकदोन दिवसात रेशमा विण्याची लक्षणे दिसत होती.

नामाचा चेहरा त्या आनंदात उजळला होता. ''मित्र भेटल्यामुळे फारच आनंदी दिसता,'' ताट वाढत वाढत राधा बोलली.

''अगं! दोस्त तर आलाच. पण एकदोन दिवसात एक पाहुणाही येणार आहे आपल्या घरात. बहुतेक एकदोन दिवसात रेशमा विते,'' नामा म्हणाला.

''अरे वा! मग तर दुधात साखर,'' सखा बोलला. राधाने साखरेचा डबा आणला. हातानेच सखाच्या वाटीत बचकभर साखर टाकली.



''अहो वहिनी! साखर वाढा असे म्हणायचे नव्हते मला. मी आलो. परत तुमची रेशमा विणार. घरात नवा पाहुणा येणार. म्हणून मी म्हणलो दुधात साखर.''

''अहो भाऊजी! दुधातच काय साऱ्या संसारात साखरच साखर भरलीय माझ्या,'' असे म्हणत राधा आग्रहाने वाढत होती.

जेवण आटोपले. नामा सखाला घेऊन गोठ्याकडे गेला, तो तेथील एकेक गोष्ट गुरांबाबत दाखवत होता. सांगत होता. सखा ऐकत होता. बारकाईने पाहात होता.

ऊन पावसापासून संरक्षण होईल असा गोठा. बांबूच्या ताट्यांनी बांधला होता. गायींना चारा खाण्यासाठी गव्हाण होती. ती दोन फूट उंच बांधली होती. त्यामुळे चाऱ्याची एक काडीही वाया गेलेली दिसत नव्हती. पिंपळाच्या झाडांनी गोठ्यावर सावली धरली होती. हवा खेळत होती. छायाची कालवड तिच्या पायात घुटमळत होती. रेशमा छायाला चाटत होती. मोठी झाली म्हणून काय झाले. शेवटी पोटची लेकच ना.

गोठा झाडायचा खराटा ताठ ऐटीत उभा होता. बाजूलाच शेण उचलण्याचे टोपले होते. तेही नीटस दिसत होते. लेकराला आंघोळ घालून स्वच्छ ठेवावे तसे छायाचे वासरु दिसते होते. राधाने सगळे कसे निगुतीने टापटीप ठेवले होते. सखा सारे निरखून पहात होता.

नामाच्या सुखाचे गुपित सखाला कळले होते. आपणही असे काहीतरी करावे. असे तो मनोमन ठरवत होता.

''बघितलास का सखा माझा संसार,'' नामा म्हणाला.

''गड्या, दृष्ट लागेल असा संसार उभा केलाय तू. डोळ्यांचं पारणं फिटलं माझ्या,'' सखा म्हणाला.

''पण हे काही एकदम झाले नाही. बराच त्रास झाला. सगळे उभे करतांना तीनचार वर्षापूर्वी मीही असाच विवंचनेत होतो. काय करावे काही सुचत नव्हते. पावसाने दडी मारली होती. तोंडचे पाणीच पळाले. पीक आलेच नाही. खायची मारामार. पोरांची उपासमार पहावत नव्हती. सावकाराकडून कर्ज काढले. त्याच्यावरचे व्याज अवाच्या सवा झाले. हे बरोबर नाही असे समजत होते. मनाला पटत नव्हते. पण इलाज नव्हता.

खरं सांगू सखा! जगात सगळेच आराम करतात. पण कर्ज कधीच आराम करत नाही. कर्जाची वाढती कमान माझी मान मोडत होती. कोठेही उसनेपासने भेटेना. भावकीतले लोक बोलेना. कोणीच मदतीचा हात देईना. ज्याचे दुःख त्याला, काय होय भलत्याला. पार पार गोंधळून गेलो होतो. मरण येत नव्हते म्हणून जगत होतो.

''पण एक दिवस...'' असे म्हणून नामा थांबला. त्याच्या डोळ्यातून टचकन् पाणी आले. सखा नुसता त्याच्याकडे पहात होता.



नामाने डोळे पुसले. तो सांगू लागला, ''एके दिवशी प्रौढ शिक्षण केंद्राचा संघटक आला. त्याने गांवात दुग्ध विकास अधिकारी बोलावले होते. मीही त्यांच्या सभेला गेलो. दुधाची गंगा आपल्या दारी आली आहे, हे समजावून सांगत होते. दुधाच्या धंद्यासाठी काय करावे लागते, कर्ज कसे मिळते. याची त्यांनी सविस्तर माहिती दिली. अर्जाचे फॉर्म दिले. मी कर्जासाठी अर्ज भरून दिला.

लवकरच कर्ज मंजूर झाले. सुरवातीला रेशमा विकत घेतली. तिला छाया झाली. उन्हात पडणाऱ्या माझ्या संसारावर तिने सावली धरली म्हणून राधाने तिचे नाव छाया ठेवले. काही दिवसाने छायाही व्याली. आता घराचेच गोकुळ झाले आहे.

शेतीच्या तोट्याला मला पर्याय सापडला. तुलाही हा धंदा करून स्वतःच्या पायावर उभे रहाता येईल.''

''पण नामा मला हे जमेल का?''

''हो. हो. चांगले जमेल. सरकारने सगळीकडे 'एकात्मीक ग्रामीण विकास योजना' काढली आहे. या योजनेद्वारे गरीब लोकांकरिता तसेच अनुसूचित जाती–जमातीसाठी कर्ज देण्यात येते.''

मडकी घडवतांना कुंभार जसा मडक्याला आतून हाताचा आधार देतो, तसाच आधार नामा सखाला देत होता. योजना समजावून सांगत होता. या योजनेमार्फत निरनिराळे

व्यवसाय करता येतात. दुधाचा धंदा त्यातीलच एक आहे. शेतीला जोडधंदा म्हणून तो उत्तम आहे. पूरक आहे.

सहकारी बँका, व्यापारी बँका त्यासाठी कर्ज देतात. ग्रामीण भागाचा विकास हा या योजनेचा मूळ हेतू आहे. या योजनेद्वारे गाय घेणाऱ्याला पंचवीस टक्के अनुदान मिळते. अनुसूचित जाती–जमातीच्या लोकांसाठी पन्नास टक्के अनुदान दिले जाते. सरकार अशा प्रकारे मदत करायला तयार आहे. आपणच फायदा घेत नाही. 'देरे हरी पलंगावरी.' अशी आपली सवय झालेली असते. ती आपण बदलली पाहिजे. कष्ट करण्याची शरीराची व मनाची तयारी ठेवली पाहिजे. राबेल तो चाबेल बाबा रे, आपला हातच जगन्नाथ असतो.''

''नामा मला हे सगळे पटले आहे. तुझ्यासारखाच जोड धंदा करायची माझी तयारी आहे. मला तू मदत कर. शेवट पावेतो साथ दे.''

दुसऱ्या दिवशी दोघेही पंचायत समितीत गेले. तेथील अधिकाऱ्यांना भेटले. दुग्ध विकास अधिकारी यांना भेटले. त्यांच्याशी चर्चा केली. त्यांनी सारे समजावून त्यांना बँकेच्या मॅनेजरकडे पाठविले.

बँकेचा मॅनेजर नामाला ओळखत होता. वेळच्या वेळी त्याने बँकेचे हप्ते भरले होते. आज तो कर्जमुक्त झाला होता. त्याच्या कष्टाची मॅनेजरला माहिती होती. चिकाटीची





जाणीव होती. त्याला बघताच मॅनेजरने त्याची आपुलकीने चौकशी केली.

''एक काम घेऊन आलो आहे साहेब.''

''सांग ना!''

''हा माझा दोस्त सखा. याला उद्योग धंद्यासाठी काही कर्ज पाहिजे.''

''ठीक आहे. मिळून जाईल.'' हे ऐकून सखा सुखावला. नामालाही बरे वाटले.

''सध्या काय करतात हे?'' मॅनेजरने नामाला विचारले.

''सध्या काहीच करत नाही. दोनचार दिवसापूर्वीच मुंबईहून आला आहे.''

"म्हणजे?" मॅनेजरने प्रश्नार्थक नजरेने विचारले.

नामा सांगू लागला, "तो मुंबईला नोकरीधंदा करायला गेला होता. आपल्याच गांवचा. त्याच्याकडे तीन एकर जमीन आहे. खाणारी तोंडे जास्त म्हणून भागत नव्हते. गेला मुंबईला. पण तेथेही जमले नाही. आला परत गांवाकडे. आता शेतीबरोबर जोडधंदा करायचे ठरवले आहे."

"वा! फारच छान. लोक एकदा मुंबईला गेले की परत येत नाहीत. शहराकडून गावी येणे त्यांना पटत नाही. तुम्ही मात्र आपल्या जन्मभूमीकडे परत आलात. मला बरे वाटले."

मॅनेजरने घंटी वाजवली. तसा शिपाई आला. मॅनेजरने चहा सांगितला. सखाचा चेहरा आनंदाने फुलला होता. चहा आला. चहा पीत पीत मॅनेजर बोलत होते. कशाकशाला कर्ज मिळते. ते सांगत होते. शेतीला कोणकोणते पूरक धंदे आहेत, तेही त्यांनी सांगितले.

भाजीपाला उत्पादन, गोबरगॅस, वराह पालन, मत्स्योद्योग, कुक्कुटपालन, दुग्ध व्यवसाय, रेशीम उद्योग, मधमाशी पालन, शेळीपालन अशा बऱ्याच उद्योगांची त्यांनी माहिती दिली. सखाच्या ध्यानात दुग्ध व्यवसाय राहिला. कारण त्याच्या मनाने ते पक्के ठरविले होते. त्या व्यवसायामुळे नामाचे भाग्य उजळलेले त्याने पाहिले होते.

"मग सांगा कोणता व्यवसाय करणार" असे मॅनेजर



म्हणताच चटकन सखा बोलला, "दुधाचा धंदा."

"वा! फारच छान," असे म्हणून मॅनेजर दुधाच्या धंद्या बद्दल जास्त माहिती देऊ लागले, "तुमच्यासाठी ही योजना फारच चांगली आहे. काही शेती आहे म्हणता. त्यामुळे चाऱ्याची सोय आहे. दुधाला चांगला भाव आहे. चांगली बाजारपेठ आहे.

"गांवात जनावरांचा दवाखाना आहे. त्यामुळे औषधपाणी करणे सोयीचे जाईल. मुलाबाळांच्या पोटातही दूध जाईल. हातात पैसा खेळता राहील. शेतीला खत मिळेल. गांवात नामासारखी पत मिळेल. खरं म्हणजे माझ्यापेक्षा नामाच तुम्हाला अधिक सांगेल. त्यांना प्रत्यक्ष अनुभव आहे. तर मग कागदपत्र गोळा करायला लागा. आणि या लवकर."

सखाने कागद-पत्रं दाखल केली. बँकेने कर्ज मंजूर केले. नामा आणि सखा गायी घ्यायला बाजारात गेले. वेगवेगळ्या रंगाच्या उंचीच्या भरपूर गायी बाजारात आल्या होत्या.

"किती प्रकारच्या गायी आहेत," सखा म्हणत होता.

"भारतात सव्वीस प्रकारच्या गाईच्या जाती आहेत," असे सांगत नामा म्हणाला, "पण त्यातल्या जास्त दूध देणाऱ्या गायी फार कमी आहेत."

"काय कारण त्याचे?" सखाने विचारले. "सखा आता मात्र तू हा धंदा चांगला करशील. खात्री पटली मला. तू

किती बारीक सारीक प्रश्न विचारतो आहेस. नीट समजावून घेतो आहेस. अरे बाबा! जो धंदा करायचा, त्याची सगळी माहिती पाहिजे."

"म्हणून विचारतोय मी."

"ठीक आहे. तर मी सांगत होतो. दूध देणाऱ्या गायी कमी आहेत कारण आपण पुरेसा नीट चारा देत नाही. पौष्टिक आहार त्यांना माहीतच नसतो. शिवाय ज्या वळू किंवा बैलापासून त्या गाभण रहातात, ते जोमदार नसतात. त्यामुळे आपल्याकडच्या गायी कमी दूध देतात. त्या ऐवजी सिद्ध वळूकडून गाय फळवली पाहिजे. किंवा पशुसंवर्धन कार्यालयात त्याचे रेत (वीर्य) ठेवलेले असते. ते संकरासाठी वापरावे."

नामा गायीच्या दुधाळपणासंबधी बोलत होता. हे पाहून सखाने मध्येच विचारले, "गायीचे दूध उडवले जाते का?"

"साफ खोटं. काहीही सांगतात लोक," ताडकन थोड्या रागानेच नामा बोलला. "हा अंधश्रद्धेचा भाग आहे. गायीची लोक नीट काळजी घेत नाही. त्यामुळे आजारी पडणे, पोटफुगी होणे, कासेचा रोग होणे, कधी एखादी जखम होणे असं होऊन त्यामुळे गाय चारा खात नाही. त्यामुळे दूध येत नाही. म्हणून गायीला डॉक्टरकडे नेले पाहिजे. दुभत्या गायीला कोरडी व ओली वैरण द्यावी. पौष्टिक आहार म्हणजे सुग्रास द्यावे. क्षार मिश्रण द्यावे."



ही माहिती सांगत सांगतच बाजारातील जास्त दूध देणाऱ्या जर्सी, फ्रिजीयन, होलस्टीन या गायींची अगदी शेपटी धरून नामा ओळख करून देत होता.

भुरक्या रंगाची, पाणीदार डोळ्याची तजेलदार अशी एक जर्सी गाय दोघांनी पसंत केली. सौदा झाला. सखाला हायसे वाटले. गाय घेऊन घरी केव्हा पोहचेन, असे त्याला झाले होते.

घरच्या रस्त्याने पाय चालू लागले. नामा मागून गाय हाकलत होता. घरी पोरं सखापेक्षा आज गायीचीच वाट पहात होती. तेवढ्यात त्यांना सखाने हातात दोराने बांधलेली गाय दिसली. घरी पळत जाऊन त्यांनी आईला हाक मारली. पारू हातात गुळाचा खडा आणि तांब्यात पाणी घेऊन अंगणात आली. गायीला बघून आनंदाने हसली. गायीच्या पायावर तिने पाणी टाकले. तिच्या तोंडात गूळ घातला.

नामा म्हणाला "वहिनी नुसती पूजा करूनच भागणार नाही. नीट निगा राखा तिची. लेकीसारखा जीव लावा तिला. चलतो मी. रेशमा माझी वाट पहात असेल."

सखा, पारू गायीची व्यवास्थित निगा राखू लागले. पारू दररोज निगुतीने गोठा साफ करायची. वेळेवर वैरण द्यायची. मुले देखील चारापाणी करीत. "कधी विते ग आपली गाय," असे वारंवार आईला विचारू लागली. एक दिवस

गायीनेच त्यांच्या प्रश्नाचे उत्तर दिले. कालवडीच्या रूपाने.

सखाने बाजारातून कॅन आणली. दूध घेऊन तो शेजारच्या गावी डेअरीवर जाऊ लागला. नामा सखाची तेथे दररोज भेट होई. दोघांच्या गप्पा होऊ लागल्या. आपल्याच गावात सहकाराने डेअरी काढण्याचे त्यांनी ठरवले. बेकारीला कंटाळून गावातले आठदहा तरूण मुंबईला जाणार होते.

नामा सखा त्यांना भेटले. दूध डेअरीसाठी त्यांची मने वळवली. तरुण तयार झाले. स्वतःच्या पायावर उभे रहाण्याचा त्यांना मार्ग सापडला. गांवात डेअरी सुरू झाली.

नामासारखाच सखाचा संसार सुखी झाला. पोरांनी बाळसं धरलं. बायकोच्या अंगावर दोन डाग झळकले. डेअरीने गांवात हुरूप आणला होता.

एक दिवस बसून सखा आणि पारू मोठ्या पोरीच्या लग्नाचा बेत रचत होती. चांगला शिकला सवरला मुलगा बघा असे पारु म्हणत होती. गप्पा अगदी रंगात आल्या होत्या.

मध्येच सगळ्यात लहान मुलगा धावत आला. तो सखाच्या गळ्यात पडला आणि सांगू लागला, ''बाबा शेजारच्या माधव, मुन्नीला कसे त्यांचे आजोबा गोष्टी सांगतात. तुम्हीही आम्हाला गोष्ट सांगा.''



सखाचे लक्ष भिंतीकडे गेले. त्याला वडिलांचा म्हातारपणी काढलेला फोटो दिसला. त्याच्या डोळ्यात टचकन पाणी आले. बाबा गेले तेव्हा त्यांच्या तोंडात टाकायला थेंबभर सुद्धा दूध मिळाले नव्हते.

"आज माझ्या घरात दुधाची गंगा वहातेय. पण बाबा गेला तेव्हा त्याच्या तोंडात टाकायला थेंबभरसुद्धा दूध मिळाले नव्हते."

त्याने बाबाच्या फोटोपुढे हात जोडून म्हटले, "बाबा, आज तू हवा होतास रे!"

बाबांच्या छायाचित्रातील चेहऱ्यावर प्रेमळ हंसू खेळत होते.

Printed at Print Process, New Delhi